# प्रेस नोट

दिनांक १६/०५/२०१८

## “स्वारगेट पोलीस ठाणेच्या गुन्ह्यातील आरोपीस जन्मठेप”

सौ. भारती ललीत परदेशी वय २५ वर्षे, रा. २४८ पर्वती पायथा स्वारगेट पुणे या नवविवाहीत महिलेने दिनांक २१/६/१६ रोजी राहते घरी अंगावर रॉकेल ओतून घेवून स्वतः पेटवून घेतल्याने त्यामध्ये ती ७५% भाजली होती. तिचेवर ससून हॉस्पिटल येथे औषधोपचार सुरु असताना तिने मृत्युपुर्व जबाबामध्ये कोणाविरुध्द तक्रार दिली नव्हती. तिचेवर उपचार सुरु असताना ती दिनांक २८/६/१६ रोजी मयत झाली.

सौ. भारती ललीत परदेशी ही मयत झाल्यानंतर तिची आई फिर्यादी नामे सौ. सुमन रामू मदनवाले, रा. उत्तर बाजार, नवी तालीम सोलापूर यांनी त्यांची मयत मुलगी सौ. भारती हिला तिची सासू सौ. कुंदा सुनिल परदेशी आणि सासरे श्री सुनिल मनोहर पदेशी यांनी लग्न झाल्यापासून घालून पाडून बोलणे, नव-याजवळ बसू न देणे तसेच सासरा सुनिल परदेशी याने वाईट नजर ठेवून मानसीक व शारीरिक छळ केल्याने भारती हिने आत्महत्या केलेबाबत फिर्याद दिली. त्याबाबत स्वारगेट पो.स्टे.गु.र.नं. २१४/१७ भादंवि क. ४९८(अ), ३०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचा तपास महिला पोलीस उप निरीक्षक श्रीमती शोभा क्षिरसागर, पोहवा सुनिल कुलकर्णी यांनी केला. मयताचे पतीचे हे दुसरे लग्न असून पहिली पत्नी सासू सासरे त्रास देतात म्हणून सोडचिठ्ठी देवून निघून गेली असल्याचा पुरावा तपासी अधिकारी यांना मिळाला. तसेच तपासी अधिकारी यांनी घटनास्थळाचा पंचनामा करुन महत्वाचे साक्षीदारांचे जबाब नोंदविले. आरोपी विरुध्द सबळ पुरावा प्राप्त करुन मा.न्यायालयात दोषारोपपत्र पाठविले. सदर केसची सुनावणी मा. सेशन कोर्ट एस.जी.घरत यांचे कोर्टात चालू असताना पोहवा संजय थोरात यांनी सर्व साक्षीदार यांना मा.न्यायालयात हजर केले. मा. सेशन कोर्ट एस.जी.घरत यांनी सर्व पुरावा साक्षी यांचे अवलोकन करुन मयताचा सासरा आरोपी नामे सुनिल मनोहर परदेशी याला भादंवि क. ३०६ मध्ये ३ वर्षे सक्त मजूरी व ५,०००/- रुपये दंड, दंड न दिल्यास तीन महिने सक्त मजूरी व भादंवि क. ४९८ मध्ये २ वर्षे सक्त मजूरी ही शिक्षा ठोठावली आहे.

१६/५/१८

**( डॉ. प्रविण मुंढे )**
पोलीस उप आयुक्त
परिमंडळ २ पुणे शहर